(३१)

Exh. 15

रे.क.नं.-२२/२०२६

मे. नामदार सेवेशी मे. दिवाणी न्यायाधीशसो क स्तर,
साहेब कोपरगाव.

मारुती तुकाराम पाटील - वादी

वि

शोभा शिवाजी पाटील - प्रतिवादी

अर्जदार वादी तर्फे विनंती अर्ज

असा की,

सदरचे कामी वादी यादीसोबत काही महत्वाचे कागद हजर करीत आहोत. तरी सदरचे कागद रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे.

सबब, मे. कोर्टास नम्र विनंती की, न्यायाचे कारणास्तव सदरचे कागद रेकॉर्डवर घेण्यात यावेत.




Order Allowed.
C.J.J.D.
Dt.30/04/2026

कोपरगाव
ता. 1/4/2026

(वादी तर्फे वकील)

Exh. 16

रे.मु.नं. 22/2026

मे. दिवाणी न्यायाधिश सो, क. स्तर, कागल

मौजे कोगील

सरस्वती तुकाराम पाटील - वादी

विरुद्ध

शेवंता शिवाजी पाटील - प्रतिवादी

खालील वादी तर्फे कागद यादी खालील प्रमाणे :

| अ.नं. | कागदाचा तपशील | तारीख | शेरा |
| --- | --- | --- | --- |
| 1. | प्रतिवादी नं. 1 यांना ता. 17/3/2026 रोजी ग्रामविकास अधिकारी कोनवडे यांनीकडे दिलेला तक्रार अर्ज | | |
| 2. | ग्रामविकास अधिकारी कोनवडे यांनी वादी यांना दिलेले पत्र | 21/2/2025 | — |

येणे प्रमाणे 2 कागद हजर असे.

सही

(वादी तर्फे वकील)

कागल

ता. 1/4/2026.

Order
Filed.
C.J.J.D.
Dt.30/04/2026

अ.नु.क्र. ५ यादी तर्फे द्वार ...

ग्रामपंचायत केनवडे
स्थापना
१९५७
ता.कागल, जि.कोल्हापूर

दि. १५/११/२०२५

प्रति,
मा. ग्रामविकास अधिकारीसो,
ग्रामपंचायत मौजे केनवडे
ता. कागल, जि. कोल्हापूर

यांचे सेवेशी...

अर्जदार : शेवंता शिवाजी पाटील, रा. बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर.

विषय : मौजे केनवडे, ता. कागल येथील गट नं. ३५४/अ वर बेकायदेशीर घरकुल बांधकाम करीत असलेबाबत...

महोदय,

मी वरील पत्यावर कायमपणे राहत असून माझे मालकीचे गट नं. ३५४/अ क्षेत्र हे.आर.पॉ. ०.३४.२० आकार रू. ४.१८ यापैकी माझे हिस्सेचे क्षेत्र हे.आर.पॉ. ०.२२.२७ ची मिळकत मी दि. १६/०२/२०१८ इ. रोजी २६९/२०१८ ने तुकाराम गोपाळा पाटील, रा. केनवडे, ता. कागल यांना रोख रक्कम अदा करून सदरची मिळकत खरेदी घेतलेली आहे. सदर मिळकतीत मशागत करणेकामी आम्हांस वारंवार ये-जा करणेस शक्य होत नाही. या संधीचा गैरफायदा घेत माझे मिळकतीशेजारील सहहिस्सेदार माझे भाऊ श्री. मारूती तुकाराम पाटील यांनी आपले मिळकतीत मशागत करणेसाठी रहिवास म्हणून तसेच इतर साहित्य ठेवणेसाठी व जनावरे बांधणेसाठी तात्पुरत्या स्वरूपाचे शेड उभा केले होते. सदर शेड उभा करीत असताना त्यांना मी विरोध केलेला होता. त्यांनी सदरचे शेड तात्पुरते उभा करीत असून लगेचच काढून घेईन, असे सांगितले. सदर शेड काढून घेणेबाबत त्यांना वारंवार विनंती केली असता त्यांनी सदरचे शेड बांधकाम काढून घेतले नाही. याबाबत आम्ही दि. १९/०६/२०२३ इ. रोजी कागल पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केलेली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा. पोलीस निरीक्षकसो यांनी त्यांना तोंडी समज देऊन सदर मिळकतीत अडथळा करणेचा नसलेबाबत सांगितले होते.

दा.ता.
१८/११/२०२५

परंतु वर नमूद श्री. मारूती तुकाराम पाटील यांनी सदर मिळकतीत तात्पुरत्या स्वरूपात बांधलेले शेड काढून घेतले नाही. परंतु सदरचे शेड काढून घेऊन सदर मिळकतीत ते सध्या आपले राजकीय शक्तीच्या जोरावर व दंडुकशाहीने घरकुल बांधत आहेत. सदर घरकुल बांधणेसाठी मी त्यांना विरोध केला असता मला वारंवार शिवीगाळ करून माझे

अंगावर हत्यारे (उदा. कोयता, कुऱ्हाड, खुरपे) घेऊन येऊन मला ठार मारणेची धमकी देत आहे. याबाबत मी मा. अध्यक्ष तंटामुक्त समिती यांना कळविले असता त्यांना देखील धमकी देऊन सदरचा वाद मिटवणेबाबत बेदखल केले आहे.

आपणास या अर्जाव्दारे विनंती करतो की, श्री. मारूती तुकाराम पाटील हे माझे मालकीचे मिळकतीत बेकायदेशीरपणे बांधत असलेले घरकुल बांधकाम थांबवून आपणाकडून स्थगिती देणेबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करून मला न्याय मिळावा व त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. सदर व्यक्तीकडून मला व माझे कुटूंबियाना धोका निर्माण झाला असून लवकरात लवकर त्यांचेवर कायदेशीर कारवाई न केलेस जीवितहानी होणेची शक्यता आहे. तरी मारूती तुकाराम पाटील यांचेविरूध्द आपण योग्य ती कडक कायदेशीर कारवाई करून मला न्याय द्यावा, ही नम्र विनंती.

मे. जा. व्हावे.

कळावे,

आपली विश्वासू

(शेवंता शिवाजी पाटील)

लेखा (अर्ज प्राप्त)

जा.क्र. ५५७

दि.१५/३/२०२६




ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत केनवडे
ता.कागल,जि.कोल्हापूर

जावक - 455
02/12/2025

ग्रामपंचायत [illegible]
स्थापना
१९५७
ता.कागल, जि.कोल्हापूर

श्री.मारुती तुकाराम पाटील

केनवडे.ता.कागल जि.कोल्हापूर

विषय :- प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२, घरकुल बांधकामाबाबत.

संदर्भ:-सौ.शेवंता शिवाजी पाटील यांचा दि.१५/११/२०२५ इ रोजीच्या तक्रार अर्ज.

वरील विषयास अनुसरून आपणास कळविनेत येते कि अपण ग.नं.३५४/अ या क्षेत्रामध्ये घरकुल बांधकाम करत आहात सदरचा ग.नं.३५४/अ हा सौ.शेवंता शिवाजी पाटील यांच्या नावावर असून त्यांनी ग्रा.पं.कडे बेकायदेशीर घरकुल बांधकाम करीत असले बाबत दि.१५/११/२०२५ इ रोजी ग्रामपंचायतीस कळवले आहे. सदर घरकुलाचे बांधकाम हे शासन नियमानुसार करावयाचे असलेने.आपले स्वताचे नावे असणाऱ्या जागेतच घरकुल बांधकाम करावयाचे आहे.आपण करीत असलेले बांधकाम हे घरकुलाचे असलेस बाधकामाच्या जागेचा मालकी पुरावा बाबतची कागदपत्र ग्रामपंचायतीस सादर करावी. तसेच तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीचे निरसन होईपर्यंत घरकुलाचे बांधकाम बंद करणेत यावे.तसे न केलेस घरकुलाचे पुढील हफ्ता अदा करणेत येऊनये याबाबत वरील कार्यालयकडे कळविनेत येईल व हफ्ते स्थगित ठेवणे बाबतची कार्यवाही केली जाईल.याची नोंद घ्यावी.

कळावे




ग्रामपंचायत अधिकारी    सरपंच
ग्रामपंचायत केनवडे
ता.कागल,जि.कोल्हापूर

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.04.30 17:47:55 +0530
MADKE AJIT BHISHMA